# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.03.2025** **वार:मंगळवार**

1. राज्याचा 2025-26चा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्राला दिशा देणारा असल्याचं अर्थमंत्री अजित पवार यांचं प्रतिपादन.
2. विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीत पाच जागांसाठी 6 अर्ज दाखल.
3. छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती राज्यात ठिकठिकाणी साजरी.
4. नागपूरच्या महाल भागात दोन गटांमध्ये झालेल्या हिंसाचार आणि तणावानंतर काही भागात संचारबंदी लागू; मुख्यमंत्र्यांचं शांततेचं आवाहन आणि
5. इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष संघाची विजयी सलामी

**विधानसभा-पवार**

राज्याचा 2025-26चा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या निर्माणासाठी विकसित महाराष्ट्राला दिशादर्शक ठरणारा अर्थसंकल्प आहे, असं अर्थमंत्री अजित पवार यांनी काल सांगितलं. महाराष्ट्राचा संतुलित विकास करण्याची क्षमता अर्थसंकल्पात असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अजित पवार यांनी काल विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर दिलं. राज्याचं कर्ज, महसुली तूट आणि राजकोषीय तूटही सुरक्षित मर्यादेच्या आत आहे; त्यामुळे सध्याच्या आर्थिक स्थितीबाबत निराधार आरोप करून राज्याची आर्थिक परिस्थिती खालावल्याचं खोटं चित्र रंगवू नका, असं आवाहन त्यांनी केलं.

राज्याच्या आणि विविध समाज घटकांच्या हिताच्या योजना बंद न करता गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना सरकार बंद करेल. त्यासाठी निधी दिलेला नाही असंही पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

लाडकी बहीण योजना सुरू ठेवताना त्यात दुरुस्ती करण्याची सरकारची भूमिका आहे. दुरुस्ती करताना गरीब महिलांना फायदे मिळत राहतील असं त्यांनी नमूद केलं. या योजनेबाबत बोलताना ते म्हणाले.....

***लाडकी बहीण योजनेचं अकाउंट उघडणाऱ्या बहिणींना मुंबई बँक दहा ते पंचवीस हजार रुपयांचं कर्ज देणार आहे. मी आपल्या सर्वांना एक नम्रतापूर्वक आव्हान करू इच्छितो की ज्या महिला छोटा मोठा व्यवसाय सुरू करायचा आहे त्यांच्या सारखी लाडकी बहीण योजनेत जोडून कर्ज योजना तुम्ही काढा म्हणजे ही योजना केवळ मदतीची राहणार नाही, त्यामधून महिलांचं सक्षमीकरण करण्याच्या बाबतीत आणखी एक पाऊल त्या ठिकाणी पुढे टाकलं जाईल.***

क्रांतिसिंह नानासिंह पाटील यांचे स्मारक सांगली जिल्ह्यात स्मारक उभारणे तसेच नवी दिल्लीत मराठी भाषिक नागरिकांसाठी सांस्कृतिक भवन उभारण्याची घोषणा पवार यांनी केली. बीड जिल्ह्यात विमानतळ उभारण्यासंदर्भातील कार्यवाही गतीनं केली जाईल असं अजित पवार यांनी सांगितलं.

राज्यात 124 केंद्रांच्यामार्फत 142 लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या संदर्भातल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली.

महिलांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षित वाटावं आणि अत्याचाराविरुद्ध दाद मागता यावी यासाठी राज्य सरकार सर्व खाजगी आस्थापनांमध्ये विशाखा तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक करणार असल्याचं महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत सांगितलं.

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांची मुगल शासक औरंगजेब याच्याशी तुलना केल्याचा भाजपा नेते प्रवीण दरेकर यांनी विधानपरिषदेत निषेध केला. यावर योग्य ती कारवाई केली जाईल असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

**<u>निवडणूक</u>**

राज्य विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी पाच जागांकरता सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज दाखल करायच्या कालच्या शेवटच्या दिवशी भाजपाकडून संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी यांनी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी यांनीही अर्ज भरला. तर अपक्ष उमेदवार उमेश म्हेत्रे यांनीही अर्ज दाखल केला आहे. ही निवडणूक 27 मार्च रोजी होणार आहे. मतमोजणी त्याच दिवशी संध्याकाळी 5 वाजता होणार आहे.

**<u>नागपूर तणाव-नागपूर</u>**

मध्य नागपूरच्या महाल भागात दोन गटांमध्ये झालेल्या हिंसाचार आणि तणावानंतर पोलिसांनी नागपूरच्या काही भागात संचारबंदी लागू केली आहे. पुढील आदेशपर्यंत ही संचार बंदी कायम राहील असं पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी सांगितलं आहे. दरम्यान नागपूर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्ववत करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले पोलिस आयुक्तांना दिले आहेत. नागपूरकरांनी शांतता बाळगावी, अफवांवर विश्वास ठेऊ नये आणि प्रशासनाला सहकार्य करावं असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

**<u>शिवजयंती</u>**

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती काल राज्यात ठिकठिकाणी साजरी करण्यात आली. शिवनेरी रायगडसह विविध गड किल्ल्यांवर शिवप्रेमींनी गर्दी केली होती. ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांचा विकास करुन, त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. ठाण्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या 45 फुटी पुतळ्याचं अनावरण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. तर रत्नागिरीतल्या रत्नदुर्ग किल्ल्यावरच्या शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. रत्नागिरीतील टाटा संचालित कौशल्यवर्धन केंद्राचं भूमिपूजनही काल अजित पवार यांच्या हस्ते झालं.

**<u>गुलदार नौका-सिंधुदुर्ग</u>**

भारतीय नौदलाच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारी आयएनएस गुलदार ही सेवानिवृत्त युद्धनौका सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजयदुर्ग बंदरात आणण्यात आली आहे. पर्यटन प्रकल्पासाठी या युद्धनौकेचा उपयोग केला जाणार आहे. ऐकुया अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून......

***पर्यटनात्मक ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी ही युद्धनौका विजयदुर्ग इथं आणण्यात यावी अशी मागणी विजयदुर्ग किल्ले प्रेरणोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजीव परुळेकर आणि सदस्यांनी राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली होत. भारतीय नौदलाने हि नौका एमडीटीसीकडे हस्तांतरित केली. निवती रॉकजवळ नौकेला समुद्रात समुद्र तळाशी स्थापित करण्यात येणार आहे. कालांतरान त्यावर तयार झालेले रिफ आणि कोरल पाहण्यासाठी पर्यटकांना पारदर्शक असलेल्या पाणबुडीतून नेण्यात येणार आहे. स्कुबा डायव्हिंग करून सुद्धा याचा आनंद घेता येणार आहे. समुद्र विज्ञान आणि कोरलच्या अभ्यासकांसाठी आयएनएस गुलदार यानंतर अभ्यास केंद्र***

*ठरणार आहे. सेवानिवृत्तीनंतर देखील गुलदार आता पर्यटकांच्या आणि अभ्यासकांच्या सेवेत रुजू होऊन चिरंतन सेवा देणार आहे. आकाशवाणी बात्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.*

**पीएम किसान योजना**

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी अर्थात पीएम-किसान योजनेच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या मोबाईलवर पी एम किसान लिस्ट apk किंवा पी एम किसान APK या संदेशाची लिंक उघडताच त्यांच्या बँक खात्यातली रक्कम नाहीशी होत असल्याच्या तक्रारी येत आहेत; अशा आर्थिक फसवणुकीच्या घटनांच्या प्रतिबंधासाठी शेतकऱ्यांनी, अज्ञात ए पी के फाईल किंवा लिंक डाऊनलोड करू नये, असं आवाहन पुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी केलं आहे. शेतकऱ्यांनी अधिकृत संकेतस्थळ आणि ॲपचाच वापर करावा तसंच फसवणूक झाल्यास cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार करावी, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**वि. मा. मिरासदार -निधन**

पंढरपूर इथले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, वि. मा. मिरासदार यांचं काल पंढरपूर इथं निधन झालं. ते 91 वर्षांचे होते. भारत विकास परिषद आणि अन्य सामाजिक संस्था संघटनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. पंढरपूरच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात ते सतत कार्यरत होते.

**भारती पवार -निधन**

'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या पत्नी भारती पवार यांचं काल पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं. त्या 77 वर्षांच्या होत्या. अनेक सामाजिक उपक्रमांत त्यांनी भाग घेतला. औंधजवळील बालकल्याण संस्थेमध्ये त्या 35 वर्षे सक्रिय होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यात अंत्यसंस्कार होणार आहेत.

**अंत्यसंस्कार-कोल्हापूर**

अरूणाचल प्रदेशांत चीन सीमेलगत वाहन अपघातात मृत्यूमुखी पडलेले कोल्हापूरचे जवान सुनील गुजर यांना त्यांच्या मुळ गावी शित्तुर तर्फ मलकापुर इथं शासकीय इतमामात साश्रूपुर्ण नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला.

**कबड्डी**

इंग्लंडमध्ये कालपासून विश्वचषक कबड्डी स्पर्धेला सुरुवात झाली. आशियाबाहेर आयोजित करण्यात येणारी ही पहिली स्पर्धा असून ती सात दिवस चालणार आहे. कालच्या पहिल्याच सामन्यात भारतीय पुरुष संघाने काल इटलीचा 64-22 असा पराभव करून विजयी सलामी दिली. पुरुषांची स्पर्धा अ आणि ब गटात तर महिलांची स्पर्धा ड आणि ई या दोन गटांत होणार आहे. भारतीय महिला संघ ड गटात खेळत आहे. 2019 मध्ये मलेशियाने आयोजित केलेल्या पहिल्या पर्वात भारताने पुरुष आणि महिला दोन्ही गटांचे विजेतेपद पटकावले होते.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट राहील, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार